Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- I JANUARY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# ग्रामीण कादंबरीतील स्त्रीजीवन

**प्रा. डॉ. संतोष देशमुख**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
लोकसेवा महाविद्यालय, औरंगाबाद.

साठोत्तरी कालखंडात ग्रामीण साहित्य चळवळी निर्माण करण्यात व प्रवाहित ठेवण्यात आनंद यादव, रा रं बोराडे, वासुदेव मुलाटे, नागनाथ कोत्तापल्ले, भास्कर चंदनशिव, यांचे प्रामुख्याने योगदान महत्वाचे आहे. १९६० नंतर मराठी साहित्यात वेगवेगळे साहित्य प्रवाह निर्माण झाले. यात प्रामुख्याने ग्रामीण साहित्य,दलित साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, जनवादी साहित्य हे होय. समाजातील वेगवेगळ्या घटकांचे प्रश्न, दु:ख वेगवेगळ्या साहित्य प्रवाहातून समोर येऊ लागले. साठोत्तरी कालखंड हा साहित्य निर्मितीच्या दृष्टीने फार महत्वाचा असा कालखंड आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुशिक्षित झालेली संवेदनशील आणि सृजनशील पिढी लिहिती झाली. विशिष्ट संस्काराने प्रेरित असलेली पिढी आपला अनुभव, आपल्या वेदना, उपेक्षा, अवहेलना साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करू लागली. त्यामुळे त्यांच्या लेखणीला आणि विचाराला विशिष्ट प्रकारची धार आली. ज्यामुळे प्रस्थापितांना हा विचित्रपणा वाटू लागला. प्रस्थापित असलेल्या लेखकांना, समीक्षकांना बहुजनाबद्दल, त्यांच्या जीवनाबद्दल कोणत्याही प्रकारचे आस्था नव्हती. ग्रामीण परिसर म्हणजे निव्वळ मनोरंजनाचा एक भाग, अडाणीपणाचा कहर अशा प्रकारची भावना त्यांच्या मनात निर्माण झाली होती. नव्या पिढीला नकोशा वाटणाऱ्या या विचारातून त्यांच्या स्वअनुभवाला मांडण्याच्या पद्धतीला व वास्तवाला साहित्यात स्थान मिळाले. वाचकांना खेडे म्हणजे केवळ 'हिरवे हिरवे गार गालिचे' नसून त्या ठिकाणीही माणसे राहतात. त्यांच्याही काही वेदना आहेत, अपेक्षा आहेत याची जाणीव झाली. साठोत्तरी कालखंडात साहित्याचे केंद्र मराठवाडा, कोकण, विदर्भ, खानदेश, ईकडे सरकू लागले. ग्रामीण साहित्याच्या प्रवाहात स्री जीवनाला बऱ्यापैकी स्थान मिळाले. ग्रामीण कुटुंबाचा स्त्री हा प्रमुख कणा असला तरी तिचं माणूस म्हणून चित्रण ग्रामीण कादंबरी मध्ये येताना दिसत नाही. प्रस्तुत लेखात आपण मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीमध्ये आलेल्या स्री जीवनाचा थोडक्यात आढावा घेणार आहोत. त्यासाठी काही निवडक कादंबरीमधील स्री व्यक्तिरेखांचा आपण विचार केला आहे.

## मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीतील स्त्री जीवन

मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीत पुरुष व्यक्तिरेखाबरोबरच स्री व्यक्तिरेखा प्रामुख्याने आलेल्या आहेत. मराठवाड्याची स्री ही इतर प्रदेशांपेक्षा अधिक सोशिक मानसिकतेची आहे. या भूप्रदेशावर झालेला रझाकारांचा उच्छाद व अस्मानी संकट यामुळे ही मानसिकता बनलेली दिसते. ग्रामीण कादंबरीतून निसर्ग, शेती, सुगी,दुष्काळ या बाबींचे चित्रं येऊ लागले. चांगला पाऊस पडला की हंगाम चांगला येतो,जीवन सुखी होते पण एखाद्या वर्षी कमी पाऊस पडला तर त्याचा परिणाम संपूर्ण ग्रामीण जीवनावर होत असतो. पारंपरिक शेतीमध्ये उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे कौटुंबिक संघर्ष निर्माण होतात. सावकाराचे कर्ज, मुलीचे लग्न, आजारपण या सर्व संकटामुळे कुटुंब उद्ध्वस्त होते. या सर्व घटकांचा अप्रत्यक्षपणे नातेसंबंधावर परिणाम होत

असतो. यात सर्वात जास्त भरडली जाते ती स्त्री.स्री ही कुटुंबात महत्त्वाची भूमिका बजावत असली तरी ती उपेक्षित जीवन जगते आहे. याचे चित्रण मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीतून आलेले दिसते. कुटुंबामध्ये जीवन जगत असताना स्त्रीला अनेक भूमिका बजवाव्या लागतात. त्यात तिला तारेवरची कसरत करावी लागते.घरात सासु, मुलगा, पती, सासरा, मुलगी, दीर, नणंद या सर्वांना आनंदी ठेवण्याची जबाबदारी स्त्रीची असते. घरातील प्रत्येकाचे स्वभाव हे वेगवेगळे असतात. प्रत्येकाचा स्वभाव ओळखून त्याप्रमाणे तिला वागावे लागते. यातून एकमेकात समज-गरसमज निर्माण होतात. प्रसंगी वादही होतात. फार मोठ्या प्रमाणात मानसिक त्रास तिला सहन करावा लागतो.

स्री कोणत्याही कुटुंबातील असो तिच्या वेदना, दुःख हे एक सारखेच असते. सधनता ही माणसाला वेगळा विचार, प्रगल्भता निर्माण करण्यास मदत करते. वास्तविक पहाता मराठवाड्यातील या सधन कुटुंबातील स्त्रिया स्वत्वाची जाणीव असणाऱ्या हव्या होत्या.काही निवडक कादंबऱ्याचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की पतीचा मान ठेवणाऱ्या, कर्त्या पुरुषावर अवलंबून असणाऱ्या, सासू-सासऱ्यांचा जाच सहन करणाऱ्या, आपल्यावर वांझपणाचा शिक्का नसावा अशी भावना असणाऱ्या, शेती बारदाना सांभाळत सांभाळत स्वतःच्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करणाऱ्या, रीती प्रथा परंपरा याचे पालन करणाऱ्या अशा या स्त्रिया आहेत. मथुरा, गंगा, कुसुम, कमळाबाई , अयाजी,भावली द्वारका, अक्का, सुमित्रा, मिताली, मनकर्णीका या आणि अशा अनेक स्त्रियांचा आपल्याला जीवनपट अभ्यासता येतो.

पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये सर्वच ठिकाणी स्त्रियांचे जीवन पुरुषांच्या तुलनेत कष्टमय परावलंबी तसेच दुय्यम स्वरूपाचे असते. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यातील ग्रामीण भागातील स्री अधिक हतबल व सोशिक दिसते. "अज्ञान, दारिद्र्य, परावलंबन, अंधश्रद्धा, कुपोषण अशा अनेक समस्यांनी स्त्रीचे जीवन पोखरलेले दिसते."१ मराठवाड्यातील निजामी राजवटीचा स्रीच्या जीवनावर विपरीत परिणाम झालेला दिसतो. मराठवाड्यातील ग्रामीण स्त्रीचे कौटुंबिक जीवन खूपच हलाखीचे आणि गुंतागुंतीचे होते. स्त्रीच्या कौटुंबिक जीवनात नवऱ्याला महत्त्वाचे स्थान आहे. ग्रामीण भागाचा बारकाईने विचार केल्यास असे दिसते की,अनेक स्त्रियांचे नवरे व्यसनी, आळशी, बेफिकीर स्वभावाचे, बायकोच्या कष्टावर जगणारे असे आढळतात. समाज आपल्याला नाव ठेवील या भीतीने या स्त्रिया निमूट सहन करत राहतात."कुंकवाशिवाय भांगाला आणि नवऱ्याशिवाय भानवशिला शोभा न्हाय"२ या परंपरागत समाजसंकेताने त्या आपल्या जीवाची राखरांगोळी करून घेतात.

मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीत चित्रित झालेल्या सधन कुटुंबातील स्त्रिया मोजक्याच असल्या तरी तिच्या पुढील समस्या असंख्य आहेत. रा रं बोराडे यांच्या आमदार सौभाग्यवती या कादंबरीतील 'सुमित्रा' ला अशाच प्रकारचा संघर्ष करावा लागतो. सुमित्राच्या मनात नसतानाही चिमणराव स्वतःच्या स्वार्थासाठी तिला राजकारणात ओढतात. परंतु नंतर नवऱ्याचे गलिच्छ राजकारण तिच्या लक्षात आल्यावर ती त्याला विरोध करू लागते. सुमित्राच्या बाबतीत थोडक्यात सांगायचे झाले तर,"स्रीच्या कर्तुत्वाला चालना मिळाली तर ती कसे कर्तृत्व गाजवू शकते हे या कादंबरीची नायिका सुमित्रा दाखवून देते."३ वि. शं. पारगावकर यांच्या अंतरीता या कादंबरीतील 'मथुरा' ही एक व्यक्तिरेखा. मथुरा ही आई-वडिलांचे छत्र हरवलेली, लग्न झाल्यावर तात्याचा संसार इमानेइतबारे करते. आपली कूस उजवत नाही हे तिचे दुःख आहे. मातृत्व हा स्री जीवनातील फार मोठा आनंदाचा क्षण, पण त्याच गोष्टीला मथुरा मुकल्याने ती अबोल होते. मुलासाठी मथुरा स्वतःला सवत आणते. सवत कृष्णा जेव्हा बाळंत होते तेव्हा ती 'तुम्हाला मुलगा

झाला' असे नवऱ्याला सांगते. यातूनच आपण वांझ आहोत याची सल तिच्या मनात टोचताना दिसते. गांधारीचे डोळे मध्ये 'कुसुम'च्या रूपाने ग्रामीण अविवाहित मुलीचे परावलंबित्व, तसेच विवाहासारख्या महत्त्वाच्या निर्णयावर देखील तिला न मिळालेले स्वातंत्र्य, आई-वडिलांच्या मर्जीखातर स्वतःच्या आयुष्याची परवड करणाऱ्या मुलीचे चित्रण आपल्याला पाहायला मिळते. मंधान या कादंबरीतील 'यशोदाबाई' तर एक वेगळीच व्यक्तीरेखा. घरात सर्व काही आहे परंतु नवऱ्याने यशोदाला 'चंपा' नावाची सवत आणली आहे याचे दुःख तिच्या मनात सतत घर करताना दिसते. यशोदा ही खूप मोठ्या मनाची आहे. यशोदाबाईचे दुखत असताना चंपा जेव्हा तिला भेटायला येते त्यावेळी त्या दोघीत झालेला संवाद ग्रामीण स्त्रियांच्या उदारतेचा नमुना आहे. " सांगू न्हाई पण सांगते पोरी, आमच्या गाडीचं यक चाक अवकाळी कुचकामी झालं... तू नसतीस तर दुसरी कुणी असती आणि कोणी नसतं तर त्यँच पाऊल गावात राहिलं नसतं. आन गावात राहिले तर...."४. यशोदा हतबल होते की तिच्या मनाचा मोठेपणा आहे हे समजणे अवघड होते.

ऐसे कुणबी भूपाळमधील 'द्वारका' ही दोन्ही भावांनी गुण्यागोविंदाने एकत्र राहावे यासाठी आयुष्यभर झगडणारी. ग्रामीण कुटुंबाचे फार मोठे दुःख या कादंबरीत द्वारकाच्या माध्यमातून आपल्यासमोर येते. 'मालकी' गाजविण्याच्या हव्यासापायी मराठवाड्यातील सधन कुटुंबे लयाला गेली आहेत. द्वारकाबाई नवऱ्याच्या मृत्यूनंतर घराला भक्कम आधार देण्याचा प्रयत्न करते. घराला दोन-दोन मालक देते. परंतु ती अपयशी ठरते. ग्रामीण कुटुंबात जी स्त्री अन्नपूर्णा म्हणून वावरते तिच्या मृत्यूनंतर गोड जेवणाचा कार्यक्रम कोणी करावा यावरून भावाभावात वाद होतात यापेक्षा मोठी शोकांतिका असू शकत नाही. निसंतान असलेल्या स्त्रीचे दुःख हे जगावेगळे असते. आपल्याला मूल होत नाही याची टोचणी सतत स्त्रीला लागलेली असते. अशाच वांझ ठरलेल्या स्त्रीचे दुःख अंगारकूस मधील 'अक्काच्या' माध्यमातून समोर येते. समाजात स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन संकुचित आहे. एखाद्या स्त्रीला मूल न होणे हा तिचा स्वभाव दोष नसून तो शरीर दोष आहे याकडे दुर्लक्ष करून त्या स्त्रीला त्रास दिला जातो. ग्रामीण स्त्रियांच्या दुःखाचे अनेक पदर असतात. नवऱ्याचा तापटपणा, सासूचा त्रास, मुलांचा हेकटपणा या दुःखापेक्षाही वांझपणाचे दुःख हे फार मोठे असते. अक्काची कूस न उजवताच तिचा मृत्यू होतो. वारसदाराचा प्रश्न चाणाक्षपणे सोडणारी गढी या कादंबरीतील 'मनकर्णिका' ही एक कसलेली व्यक्तिरेखा. नवऱ्याच्या मृत्यूनंतर वारसाचा प्रश्न निर्माण होतो. त्यावेळी भावकी आपला मुलगा दत्तक घ्यावा म्हणून प्रयत्न करू लागते. अशा वेळी मनकर्णिका सासऱ्याचे लग्न लावून वारसदार निर्माण करते. मनकर्णिका ने वतनदारी चांगल्या पद्धतीने सांभाळली. मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीत अशाप्रकारच्या स्त्री व्यक्तिरेखा अपवादानेच सापडतात. घराण्याचा वतनाचा वारस व रयतेची सेवा अशाप्रकारे चे गुण मनकर्णिकेत आढळतात. ग्रामीण भागातील एक स्त्री नवऱ्याच्या मृत्यूनंतर गढी वरून कारभार करते ही बाब महत्त्वाची आहे. जीवन जगताना ग्रामीण भागातील स्त्रियांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते प्रसंगी त्या संघर्षही करतात.

स्त्री कोणत्याही समाजातील, कुटुंबातील असो तिला जाणवणाऱ्या समस्या काही प्रमाणात एकसारख्याच असतात. सधन कुटुंबातील स्त्रियांपेक्षा कष्टकरी व शोषित वर्गातील स्त्रिया असुरक्षित असतात. या वर्गातील स्त्रियांना कौटुंबिक प्रश्नाबरोबरच सामाजिक प्रश्नांना देखील तोंड द्यावे लागते. कष्टकरी कुटुंबातील स्त्री ही सतत आपल्या कुटुंबासाठी अहोरात्र काबाडकष्ट करते. रोजच्या रोजीरोटीच्या प्रश्नांबरोबरच कुटुंबातील मिळणारी वागणूक तसेच कुटुंबाची प्रतिष्ठा राखण्याची

तिची धडपड आपल्याला प्रामुख्याने कादंबऱ्यांमधून पाहायला मिळते.

स्त्री जन्म हा पुरुषांपेक्षा कमी प्रतिष्ठेचा मानला गेल्यामुळे येथील स्त्रियांच्या वाट्याला जन्मापासूनच अवहेलना आली आहे. मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीतून अनेक कष्टकरी, राबणाऱ्या स्त्रिया वास्तव रुपाने आलल्या आहेत. मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीत व्यक्त झालेली कष्टकरी स्त्री कोणत्याही प्रकारची तक्रार करत नाही. एवढे मात्र खरे की तिला कितीही त्रास होऊ दे तो सहन करण्याची तयारी ठेवत जगण्याविषयी सकारात्मकतेने विचार करते. रा.रं. बोराडे यांच्या पाचोळा कादंबरीतील पारबती ही अशीच एक व्यक्तिरेखा. पारबती ही खरोखरच मूर्तिमंत कष्टाचे प्रतीक आहे. आधुनिकीकरणामुळे ग्रामीण परंपरागत व्यवसाय डबघाईला आले. आपला व्यवसाय टिकविण्यासाठी ही लोक केविलवाणी धडपड करू लागले. गंगाराम त्याला अपवाद नाही. पारबती मात्र मात्र जुन्या विचारांची आहे. गंगारामच शहरात जाणं तिला पसंत पडत नाही. गंगाराम आजारी अवस्थेत शहरातून घरी येतो आणि पारबतीच्या हातात पैसे देतो तेव्हा पारबती म्हणते की, "ह्येच्यापेक्षा हातीपायी धड आला असताव तर किती बरं वाटलं असतं मला".५ ग्रामीण स्त्रीच्या मनात पैशापेक्षा आपला पती, आपले कुटुंब किती महत्त्वाचे असते याची आपल्याला प्रचिती येते. संभूती या कादंबरीतील 'तानी' अशीच एक कष्टकरी व सोशिक स्त्री. ग्रामीण स्त्रीचं जगणं हा या कादंबरीचा मुख्य विषय आहे. याविषयी इंद्रजित भालेराव म्हणतात की "संभूती मधील भिमाबाई, तानी आणि हुलबाई जो संघर्ष करीत आहे तो वेगळाच आहे, आणखी ढोबळपणे विधान करायचे झाले तर या तिघी मिळून पुरुषसत्तेच्या विरोधात संघर्ष करीत आहेत" ६

समाजात अनेक प्रकारच्या स्त्रिया आहेत. त्यात प्रामुख्याने विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, उपेक्षित अशा स्त्रियांचा उल्लेख करावा लागेल. अशा अनेक संकटांनी ग्रस्त असलेल्या स्त्रीया मराठवाड्याचा ग्रामीण कादंबरीत आपल्याला पाहायला मिळतात. जिनगानी मधील 'राधाबाई' ही विधवा स्त्री आहे. कोयता मधील 'पारबती', असं जगणं तोलाचं मधील 'कासा', 'धुरपा', गावपांढरी मधील 'हरणाबाई' रानखळगी मधील 'कवसा', राणीवसा मधील 'आकु', गांधारी मधील 'जयवंता', गणगोत मधील 'अंजू' या आणि अशा अनेक स्त्रिया मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीत आपल्याला पाहायला मिळतात. मातृसत्ताक कुटुंबपद्धतीत स्त्रीला महत्त्वाचे स्थान असते. अनेक भूमिकांमधून तिला जावे लागते. सर्व भूमिकांना न्याय देताना तिची विलक्षण कुचंबणा होते. कुटुंबसंस्थेला एकसंघ व मजबूत ठेवण्याचे कार्य स्त्री करत असते. गांधारी मधील 'गंगाबाई' अंतरिता मधील 'मथुरा', संभूती मधील तानीची सासू भिमाबाई या आणि अशा अनेक भूमिकांमध्ये असणाऱ्या स्त्रिया आपल्याला मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीत पाहायला मिळतात. स्त्रीच्या वाट्याला आलेला जगणं, तिचे दुःख भोग, तिचा जगण्यासाठीचा संघर्ष मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीतून आपल्याला विशेषत्वाने जाणवतो.

**संदर्भ -**

१.पाटील श्रीराम (संपादित)- मायबोलीचा मराठवाडा, खंड 2, योगेश प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली २००२ पृ. क्र.२९०

3.ढसाळ नामदेव - हाडकी हाडवळा, अस्मिता प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली,१९८२ पृ. क्र. ५१

4.लुलेकर प्रल्हाद / बडवे सतीश (संपादित) मराठवाड्यातील साहित्य, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, २००७, पृ. क्र. १३२

5.पाटील बंकट- मंधान, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती दुसरी, १९९८, पृ. क्र. ८७

6.बोराडे रा रं- पाचोळा, मौज प्रकाशन गृह, मुंबई,

प्रथमावृत्ती, १९७१ , पृ. क्र. ६४

7.भालेराव इंद्रजित- संभूती या पुस्तकाची प्रस्तावना, देशमुख आणि कंपनी प्रा. लि. पुणे, आवृत्ती पहिली, २००४, पृ. क्र. ४